सामना

# मुंबईकरांच्या समस्यांना वाचा फोडण्यात शिवसेना अव्वल

सामना ऑनलाईन | 12 Jul 2023, 7:06 am



मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि मुंबईकरांसाठी नेहमीच रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱया शिवसेनेने विधिमंडळातही मुंबईकरांच्या समस्या हिरीरीने मांडल्या आहेत. दिंडोशी विधानसभेचे आमदार आणि शिवसेनेचे मुख्य प्रतोद सुनील प्रभू यांनी विधिमंडळात सर्वाधिक उपस्थित राहून मुंबईकरांचे प्रश्न, समस्यांना वाचा पद्दली. त्या पार्श्वभूमीवर प्रजा फाऊंडेशनने 31 आमदारांमधून पहिल्या तीन क्रमांकांमध्ये प्रभू यांची निवड केली. सलग तीनदा प्रभू यांनी हा गौरव मिळवला आहे.

प्रजा फाऊंडेशनने मागील दोन वर्षांतील मुंबईतील विद्यमान आमदारांनी त्यांच्या संविधानात्मक आणि वैधानिक कर्तव्यांची पूर्तता कशी केली यांचे मूल्यमापन प्रगतिपुस्तकातून केले आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या कामकाजात सहभागी होऊन किती आमदारांनी नागरिकांच्या समस्यांवर विचारलेल्या प्रश्नांची संख्या, अधिवेशनात सभागृहातील एकूण उपस्थिती किती यावर गुण देण्यात आले. यानुसार पहिल्या तीन क्रमांकांचे गुण प्राप्त करणाऱया मुंबईतील आमदारांमध्ये काँग्रेसचे आमदार अमीन पटेल यांना 100 पैकी 82.80 टक्के गुण मिळाले, शिवसेनेचे आमदार सुनील प्रभू यांना 100 पैकी 81.30 टक्के गुण मिळाले तर भाजपच्या आमदार मनीषा चौधरी यांना 100 पैकी 75.05 टक्के गुण मिळाले. मुंबईतील 31 आमदारांचे प्रगतीपुस्तक प्रजाने तयार केले आहे.

## कालावधी घटला, प्रश्नही घटले

12व्या विधिमंडळात 2011 ते 2012 अधिवेशन कालावधी 58 दिवसांचा होता. 13व्या विधिमंडळात 2016 ते 2017 अधिवेशन कालावधी 57 दिवसांचा होता. मात्र 14व्या विधिमंडळ अधिवेशन 2021 ते 2022 हा कालावधी केवळ 38 दिवसांचा होता. 12 ते 14व्या विधिमंडळ कालावधीच्या दरम्यान अधिवेशन दिवसांमध्ये 34 टक्क्यांनी घट झाली आहे. अधिवेशनाचा कालावधी घटत असल्यामुळे लोकप्रतिनिधींची प्रश्न विचारण्याची संधीही कमी झाली आहे.

Link: मुंबईकरांच्या समस्यांना वाचा फोडण्यात शिवसेना अव्वल | Saamana (सामना)